SAMPLE CONTENT

# मराठी (LL)

# व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन

पाठ्यपुस्तकावर आधारित



Std. VIII
(ENG. MED.)

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.

हितेश कल्याणकर
BMM-Advertising

अमृत पुलेकर
M.A., B.Ed.

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ०४
यांच्याद्वारे नियोजित पाठ्यपुस्तकावर आधारित.

# मराठी (LL)

# व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन

## इयत्ता आठवी

**ठळक वैशिष्ट्ये**

- पाठ्यपुस्तकातील व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखनावर आधारित सर्व कृती समाविष्ट
- भाषाभ्यास विभागातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सुलभ स्पष्टीकरण
- भाषाभ्यास विभागात अंतर्भूत घटकांचा परिपूर्ण सराव
- उत्तरे लिहिण्याकरता पर्याप्त जागा उपलब्ध
- उत्तरांचा पडताळा घेण्याकरता उत्तरसूची समाविष्ट
- उपयोजित लेखनातील सर्व घटकांच्या संकल्पनांचे सविस्तर स्पष्टीकरण अंतर्भूत
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकावर आधारित सोडवलेल्या भरपूर कृती
- उपयोजित लेखनातील प्रत्येक घटकामध्ये सरावासाठी मुबलक कृती समाविष्ट

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 2658**

P.O. No. 4360

# प्रस्तावना

इयत्ता आठवीचे वर्ष हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. दहावीसारख्या महत्त्वपूर्ण वर्षाची पायाभरणी या वर्षापासून सुरू होते. या वर्षात अभ्यासवयाच्या अनेकविध विषयांपैकी मराठी हा भाषा विषय विद्यार्थ्यांच्या उत्तम जडणघडणीकरिता महत्त्वपूर्ण आहे. दहावीच्या दृष्टीने विचार केला, तर व्याकरण, भाषाभ्यास आणि उपयोजित लेखन यांसाठी मराठी विषयात ४० गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे, मराठी विषयात उत्तम गुण मिळवण्यासाठी, इयत्ता आठवीपासूनच व्याकरण घटकांचा सखोल अभ्यास करण्याची सवय लागावी यासाठी, तसेच भाषेवर प्रभुत्व मिळवून दहावीकरिता तयार राहण्यासाठी **टार्गेट प्रकाशनचे मराठी (LL) व्याकरण-भाषाभ्यास व उपयोजित लेखन इयत्ता आठवी** हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या हाती सोपवताना आम्हांला आनंद होत आहे.

व्याकरणाच्या पायावर भाषेची इमारत उभी राहते. हा पाया मजबूत असेल, तर भाषेवर प्रभुत्व मिळवणे सोपे जाते, तसेच व्याकरण व भाषाभ्यासात अधिकाधिक गुण मिळवणे सहज शक्य होते. यासाठी व्याकरण घटकांच्या मूलभूत संकल्पना समजून घेणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांची ही गरज ओळखून आम्ही या संकल्पनांचे सहज सोप्या भाषेत स्पष्टीकरण देण्याबरोबरच भरपूर सरावकृती समाविष्ट केल्या आहेत. मूळ व्याकरण व भाषिक घटक यांवरील विद्यार्थ्यांची पकड मजबूत होईल याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे.

उपयोजित लेखन म्हणजे नवनिर्मितीचा आनंद! विद्यार्थ्यांना स्वभाषेत लिखाणास प्रवृत्त करणे हा याच्या अभ्यासामागील मूळ उद्देश आहे. उपयोजित लेखनामध्ये समाविष्ट घटकांचे लेखन कसे करावे? कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाव्यात? कोणत्या गोष्टी टाळाव्यात? यासंदर्भातील सविस्तर विवेचन प्रत्येक घटकाच्या प्रारंभी देण्यात आले आहे. यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळावे यासाठी अनेक नमुना कृतींनी यातील सारे घटक समृद्ध करण्यात आले आहेत. यामुळे, विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व सृजनशीलतेला वाव मिळेल याची आम्हांला खात्री आहे.

व्याकरण व भाषाभ्यासावर आधारित भरपूर कृती, उपयोजित लेखनातील १५ पत्रे, ५ बातम्या, ९ जाहिराती, ६ सारांशलेखन, ६ संवादलेखन, ५ सूचनाफलक, ५ शीर्षकलेखन आणि ३६ निबंध एवढा विपुल अभ्यास झाल्यानंतर मुलांना जास्तीत जास्त गुण मिळवणे शक्य होईल.

सरावानेच सिद्धी प्राप्त होते असे म्हणतात. हा सराव योग्य दिशेने असावा याकरिता हे पुस्तक विद्यार्थ्यांना नक्कीच उपयुक्त ठरेल.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरिता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी सुलभभारती; तिसरे पुनर्मुद्रण: २०२१' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **भाषाभ्यास** | | |
| ● | **व्याकरण** | | |
| १. | शब्दांच्या जाती | | १ |
| २. | वाक्यविचार | | १२ |
| ३. | वाक्प्रचार | | १७ |
| ४. | विभक्ती आणि सामान्य रूप | | २२ |
| ● | **भाषिक घटक** | | |
| ५. | शब्दसंपत्ती | | |
| | ● | समानार्थी शब्द | २६ |
| | ● | विरुद्धार्थी शब्द | २९ |
| | ● | लिंग | ३१ |
| | ● | वचन | ३४ |
| | ● | उपसर्ग आणि प्रत्यय | ३८ |
| | ● | आलंकारिक शब्द | ४१ |
| | ● | म्हणी | ४३ |
| ६. | लेखननियम | | ४७ |
| ७. | विरामचिन्हे | | ५१ |
| | उत्तरे | | ५४ |
| | **उपयोजित लेखन** | | |
| १. | पत्रलेखन | | ६४ |
| २. | बातमीलेखन | | ७७ |
| ३. | जाहिरातलेखन | | ८३ |
| ४. | सारांशलेखन | | ९१ |
| ५. | संवादलेखन | | ९५ |
| ६. | सूचनाफलक | | ९८ |
| ७. | शीर्षकलेखन | | १०१ |
| ८. | लेखनकौशल्य<br>(वर्णनात्मक) | | |

| | निबंध | पृष्ठ | | निबंध | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १. | माझा आवडता खेळ | १०४ | ८. | चांदण्या रात्रीची सहल | १०८ |
| २. | माझा आवडता प्राणी | १०५ | ९. | समुद्रकिनाऱ्यावरील संध्याकाळ | १०८ |
| ३. | मी पाहिलेला किल्ला | १०५ | १०. | माझे आवडते लेखक | १०९ |
| ४. | बस स्थानकावरील एक तास | १०६ | ११. | माझी फजिती | १०९ |
| ५. | पहिला पाऊस | १०६ | १२. | मी पाहिलेले नाटक | ११० |
| ६. | माझे आवडते पर्यटनस्थळ | १०७ | ● | सराव कृती | ११० |
| ७. | माझा आवडता सण | १०७ | | | |


Sample Content

| | (कल्पनाप्रधान) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **निबंध** | **पृष्ठ** | | **निबंध** | **पृष्ठ** |
| १. | मी पक्षी असतो तर… | १११ | ८. | मी डॉक्टर झालो तर… | ११४ |
| २. | झाडे बोलू लागली तर… | १११ | ९. | पुस्तके नसती तर… | ११४ |
| ३. | परीक्षा नसत्या तर… | १११ | १०. | रात्र नसती तर… | ११५ |
| ४. | सूर्य उगवला नाही तर… | ११२ | ११. | पृथ्वी बोलू लागली तर… | ११५ |
| ५. | मोबाइल नसते तर… | ११२ | १२. | मी नदी झालो तर… | ११६ |
| ६. | पाऊस पडला नाही तर… | ११३ | • | सराव कृती | ११६ |
| ७. | माणसाची स्मृती हरवली तर… | ११३ | | | |

| | (वैचारिक) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **निबंध** | **पृष्ठ** | | **निबंध** | **पृष्ठ** |
| १. | जैवविविधतेची गरज | ११७ | ८. | समाजसेवा ही ईश्वरसेवा | १२० |
| २. | झाडे लावा, झाडे जगवा | ११७ | ९. | ऑनलाईन शिक्षण | १२१ |
| ३. | मोबाइल शाप की वरदान? | ११८ | १०. | प्रदूषण: एक समस्या | १२१ |
| ४. | पाणी हेच जीवन | ११८ | ११. | संगणक ज्ञान काळाची गरज | १२२ |
| ५. | व्यायामाचे महत्त्व | ११९ | १२. | पर्यटनाचे महत्त्व | १२२ |
| ६. | वाचाल तर वाचाल | ११९ | • | सराव कृती | १२३ |
| ७. | वृत्तपत्रांचे महत्त्व | १२० | | | |


**[टीप: पाठाखाली दिलेले व्याकरण, भाषाभ्यास व उपयोजित लेखनावर आधारित प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.]**

Sample Content

## व्याकरण-विभाग

# १ शब्दांच्या जाती

आपण आपल्या मनातील भावना व्यक्त करण्यासाठी बोलतो किंवा लिहितो. या भावना वाक्यांद्वारे आपण प्रकट करतो. कोणतेही वाक्य पूर्ण होण्यासाठी शब्दांची आवश्यकता असते. मराठी भाषेचा विचार केल्यास शब्दांचे काही प्रकार आहेत. शब्दांच्या या प्रकारांनाच **शब्दांच्या जाती** असे म्हणतात. शब्दांच्या एकूण आठ जाती आहेत आणि त्यांचे 'विकारी शब्द' व 'अविकारी शब्द' अशा दोन प्रमुख प्रकारांमध्ये विभाजन केले जाते. **ज्या शब्दांमध्ये लिंग, वचन, विभक्तीनुसार बदल होतात, त्यांना विकारी शब्द म्हणतात. ज्या शब्दांमध्ये बदल होत नाही, त्यांना अविकारी शब्द म्हणतात.**

**शब्दांच्या जाती**

| विकारी शब्द | अविकारी शब्द |
|---|---|
| १. नाम (Noun) | ५. क्रियाविशेषण अव्यय (Adverb) |
| २. सर्वनाम (Pronoun) | ६. शब्दयोगी अव्यय (Preposition) |
| ३. विशेषण (Adjective) | ७. उभयान्वयी अव्यय (Conjunction) |
| ४. क्रियापद (verb) | ८. केवलप्रयोगी अव्यय (Interjection) |

## नाम (Noun)

**कोणतीही व्यक्ती, वस्तू, प्राणी, जागा किंवा गुण यांना दिले जाणारे नाव म्हणजेच नाम होय.**

**उदा.** राम, घोडा, भारत, आनंद, पुस्तक.

**नामाचे प्रकार**

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचक नाम |
|---|---|---|

१. **सामान्यनाम:** एकाच जातीच्या पदार्थांच्या समान गुणधर्मामुळे त्या वस्तूला दिलेले नाव म्हणजे सामान्यनाम होय.

**उदा.** नदी, प्राणी, पर्वत, माणूस, देश.

२. **विशेषनाम:** विशिष्ट व्यक्ती, प्राणी किंवा वस्तूचा बोध होतो, त्या नामाला विशेषनाम म्हणतात.

**उदा.** भारत, हिमालय, गंगा, अजय, मुंबई.

३. **भाववाचक नाम:** व्यक्तीच्या, प्राण्यांच्या, वस्तूच्या प्रत्यक्ष किंवा काल्पनिक गुणधर्म किंवा भावभावनांना दिलेले नाव म्हणजे भाववाचक नाम होय.

**उदा.** आनंद, गारवा, श्रीमंती, सौंदर्य, प्रामाणिकपणा.

**लक्षात ठेवा**

अनेकवचन हे केवळ सामान्य नामाचे होते. इतर दोन्ही प्रकारच्या नामांचे अनेकवचन होत नाही.

Sample Content

**सराव कृती**

**कृ.१. खालील वाक्यांतील नामे ओळखून लिहा.**

i. आपण निसर्गाला कधीही विसरून चालणार नाही. – ------------------------
ii. आता मूर्ती थोड्या टिकायला लागल्या. – ------------------------
iii. पाय चालतात ते रस्ता डोळ्यांनी दिसतो म्हणून. – ------------------------
iv. परत एकदा आपण डांबरी रस्त्यावर येतो. – ------------------------
v. वाटेत उंच उंच पहाड पाहून ते फार रोमांचित झाले होते. – ------------------------
vi. मुंबईच्या परळ भागात एक इस्पितळ आहे. – ------------------------
vii. एक भली दांडगी अतिशय देखणी कुत्री तिथं निजलेली दिसली. – ------------------------
viii. मी तिच्या पाठीवर हात ठेवते. – ------------------------
ix. माझं प्राथमिक शिक्षण एका लहानशा खेड्यात झालं. – ------------------------
x. काय करणार बाबा, या पोटासाठी फिरावं लागतं. – ------------------------

**कृ.२. खालील शब्दांतील नामे ओळखून लिहा.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गुरु | भव्य | ओल्या | अधीरता | तन | गरमागरम | शूरता | काळी |
| नम्रता | अवशेष | अरुंद | दहा | त्याग | बळकट | संत | |

**उत्तर:** ------------------------------------------------

## सर्वनाम (Pronoun)

**एकाच नामाचा वापर वारंवार केला जात असेल, तर त्याऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दाला सर्वनाम म्हणतात.**
**उदा.** मी, आम्ही, तू, तुम्ही, तो, हे, तो कोण

**सर्वनामाचे प्रकार**

- पुरुषवाचक सर्वनाम
  - १. प्रथम पुरुषवाचक
  - २. द्वितीय पुरुषवाचक
  - ३. तृतीय पुरुषवाचक
- दर्शक सर्वनाम
- प्रश्नार्थक सर्वनाम
- संबंधी सर्वनाम
- अनिश्चित सर्वनाम
- आत्मवाचक सर्वनाम

**सर्वनामाचे प्रकार:**

**१. पुरुषवाचक सर्वनाम:**

i. **प्रथम पुरुषवाचक सर्वनाम:** बोलणारा स्वत:चा उल्लेख करताना यांचा वापर करतो. **उदा.** मी, आम्ही, आपण, स्वत:
ii. **द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम:** ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करताना यांचा वापर होतो. **उदा.** तू, तुम्ही, आपण इत्यादी.
iii. **तृतीय पुरुषवाचक सर्वनाम:** ज्यांच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती किंवा वस्तूचा उल्लेख करताना याचा वापर होतो. **उदा.** तो, ती, ते, त्या इत्यादी.

Sample Content

२. **दर्शक सर्वनाम:** जवळची किंवा दूरची वस्तू दाखवण्यासाठी यांचा उपयोग होतो. **उदा.** हा, ही, हे, तो, ती, ते.

३. **प्रश्नार्थक सर्वनाम:** वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी उपयोग होतो. **उदा.** कोण, काय, कोणाला, कोणी, कोणास.

४. **संबंधी सर्वनाम:** वाक्यात पुढे येणाऱ्या दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणारा सर्वनाम. **उदा.** जो-जी-जे, जे-ज्या.

५. **अनिश्चित सर्वनाम:** काही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती वाक्यांत कोणत्या नामांबद्दल आली आहेत हे निश्चित सांगता येत नाही. अशा सर्वनामांना अनिश्चित सर्वनामे म्हणतात. **उदा.** कोणी, कोणास, काय.

६. **आत्मवाचक सर्वनाम:** सर्वनामाचा अर्थ जेव्हा स्वत: असा होतो तेव्हा ते आत्मवाचक सर्वनाम असते. **उदा.** स्वत:, आपण.

## सराव कृती

**कृ.१. खालील वाक्यांतील सर्वनामे ओळखून लिहा.**

i. मी तुमच्याएवढा असताना जे अनुभवलं, पाहिलं ते तुम्हांला सांगणार आहे. – ----------------

ii. त्याला कायम जागता ठेवा. – ----------------

iii. मी वास घेणार नाही. – ----------------

iv. आपण सारेच राज्याचे सेवक आहोत. – ----------------

v. तुम्ही कोणता ना कोणता खेळ खेळलाच पाहिजे. – ----------------

vi. तो जाड व मजबूत दोराच्या साहाय्याने खाली उतरला. – ----------------

vii. त्यातून खूप धूर झाला. – ----------------

viii. आम्ही पुढं जाऊन डावीकडं वळतो. – ----------------

ix. मग ती सावरते. – ----------------

x. हे सारं पाहून मी बाहेर आले. – ----------------

xi. ती माझी सवय आहे. – ----------------

xii. आता आमच्या मूर्तींना बिलकूल तडे जात नव्हते. – ----------------

**कृ.२. खालील वाक्यांत कंसातील योग्य सर्वनाम वापरून वाक्य पूर्ण करा.**

i. ---------------- एक मित्र होता. (माझा / ते / त्याने)

ii. ---------------- गावात आठवडी बाजार भरायचा. (तो / तुम्ही / आमच्या)

iii. पोटोबा, ---------------- क्षमा करा. (तुला / आम्हांला / ते)

iv. कोणे एके काळी ---------------- कावळ्या किल्ल्याचा भाग होता. (तो / ते / ती)

v. ---------------- तिथे मनसोक्त खेळायचो. (तुम्ही / तो / आम्ही)

vi. मला बघताच ---------------- कपाटावरून उडी मारतो. (तो / ती / ते)

vii. ---------------- अनोळखी हात लागला म्हणून घाबरलो. (तू / तुमचा / त्याने)

viii. ---------------- तयारी आहे संप करण्याची. (मी / आमची / तुला)

Sample Content

# विशेषण (Adjective)

**नामाबद्दल विशेष किंवा अधिक माहिती सांगणारा शब्द म्हणजे विशेषण होय. विशेषण ज्या नामाबद्दल विशेष माहिती सांगते त्याला विशेष्य म्हणतात.**

**उदा. उंच** मुलगा, **सुंदर** चित्र, **शुभ्र** बगळा, **हिरवे** झाड

**विशेषणाचे प्रकार**

- गुणवाचक विशेषण
- संख्यावाचक विशेषण
- सार्वनामिक विशेषण

१. **गुणवाचक विशेषण**: नामाचा गुण सांगणारा शब्द
**उदा.** काळा कावळा, हुशार मुलगा, छोटा पक्षी.

२. **संख्यावाचक विशेषण**: नामाची संख्या सांगणारा शब्द
**उदा.** दहा मुली, पाचवी इयत्ता, काही खेळाडू, अनेक प्राणी.

३. **सार्वनामिक विशेषण**: नामाच्या अगोदर येणारे सर्वनाम त्या नामाबद्दल अधिक माहिती देत असेल, तर ते सर्वनाम न राहता सार्वनामिक विशेषण होते.
**उदा.** १. तो मुलगा माझा मित्र आहे. २. हे पुस्तक मी वाचले आहे.

## सराव कृती

**कृ.१. खालील वाक्यांतील विशेषणे ओळखा.**

i. निसर्गच आपल्याला नाना कला शिकवतो. – ------------------------------------
ii. माझा एक मित्र होता. – ------------------------------------
iii. झाडाची दाट सावली पडायची. – ------------------------------------
iv. वास घेण्याचेही जादा काम मी करते. – ------------------------------------
v. कावळ्या किल्ला मोठा आहे. – ------------------------------------
vi. अरुंद पायवाट सपाटीवर येऊन थांबते. – ------------------------------------
vii. आपण तिसऱ्या सहस्रकामध्ये प्रवेश केला आहे. – ------------------------------------

**कृ.२. कंसात दिलेली विशेषणे योग्य ठिकाणी वापरून रिकाम्या जागा भरा.**
(कोवळी, ओल्या, विशेष, मोठे, उंच उंच)

i. बांबूची ---------------------- काडी घेऊन पुढचं टोक ठेचलं, की त्याचा ब्रश व्हायचा.
ii. ---------------------- वाटेने परत जाताना अंगावरचे कपडे हमखास रंगतात.
iii. आमच्या शाळेला ---------------------- मैदान होते.
iv. ईशानला गिर्यारोहणाचा ---------------------- छंद होता.
v. वाटेत ---------------------- पहाड पाहून ते फार रोमांचित झाले होते.

Sample Content

*कृ.३. विशेष्य विशेषणाच्या योग्य जोड्या जुळवा.

| क्र. | 'अ' गट | उत्तर | | 'ब' गट |
|---|---|---|---|---|
| i. | भव्य | ---------- | अ. | मन |
| ii. | अमूल्य | ---------- | ब. | युग |
| iii. | नवे | ---------- | क. | शिकवण |
| iv. | सुंदर | ---------- | ड. | पटांगण |
| v. | विशाल | ---------- | इ. | जग |

*कृ.४. खाली दिलेल्या विशेष्य आणि विशेषणांच्या योग्य जोड्या लावा.

| क्र. | विशेषण | उत्तर | | विशेष्य |
|---|---|---|---|---|
| i. | विहंगम् | ---------- | अ. | वारा |
| ii. | गरमागरम | ---------- | ब. | पाषाण |
| iii. | घोंघावणारा | ---------- | क. | पायवाट |
| iv. | काळाशार | ---------- | ड. | दृश्य |
| v. | अरुंद | ---------- | इ. | कांदाभजी |

*कृ.५. खाली दिलेल्या शब्दांतून नाम व विशेषणे ओळखून त्यांच्या योग्य जोड्या लावा.

हिरवी  
डोंगर  
सावली  
राने  
निळे  
दाट

| क्र. | नाम | विशेषण |
|---|---|---|
| i. | ---------- | ---------- |
| ii. | ---------- | ---------- |
| iii. | ---------- | ---------- |

Sample Content

# क्रियापद (Verb)

**वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द म्हणजे क्रियापद होय. क्रियापदामुळे आपल्याला वाक्याचा योग्य तो अर्थ लक्षात येतो.**

**उदा.** जा, ये, कर, ठेव, होता, आहे, खेळतो, गातो.

## सराव कृती

**कृ.१. खालील वाक्यांतील क्रियापदे अधोरेखित करा.**

i. तोही मार्ग सापडला.

ii. नदी वाहायला लागायची.

iii. मी गोड बोलते.

iv. या सर्वांनी संप पुकारला.

v. ती माझी सवय आहे.

vi. आपण येऊन पोहोचतो ते वरंधा घाटात.

vii. तुम्ही आपले स्वत:चे शिक्षक व्हा.

viii. तो म्हणेल तेवढंच खायची सक्ती असते माझ्यावर!

**कृ.२. खालील वाक्यांत कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(घाबरली, शहारतं, ठेवते, लागली, पाहिजेत, आवडायचे, पाहिजे, घडतं)

i. मी तिच्या पाठीवर हात ------------------------------.

ii. तुमचा अनोळखी हात म्हणून ------------------------------.

iii. मांजरीचं सर्वांग ------------------------------.

iv. ती रात्र पहाडावर घालवावी ------------------------------.

v. मला खेळायला मात्र ------------------------------.

vi. तुम्ही व्यायामासाठी तास-दोन तास काढलेच ------------------------------.

vii. त्याची मजा तुम्ही लुटली ------------------------------.

viii. इथून वरंधा घाटाचं मस्त दर्शन ------------------------------.

**कृ.३. खालील क्रियापदांचा वाक्यात उपयोग करा.**

i. भरणे – ------------------------------

ii. शिकणे – ------------------------------

iii. खेळणे – ------------------------------

iv. पडणे – ------------------------------

v. ठेवणे – ------------------------------

vi. देणे – ------------------------------

vii. करणे – ------------------------------

viii. जाणे – ------------------------------

**कृ.४. खालील वाक्ये वाचा व त्याआधारे तक्ता पूर्ण करा.**

*i. सांगली हे महाराष्ट्रातले एक गाव आहे.

*ii. चांगले काय आणि वाईट काय हे तुमचे तुम्हांला कळते.


Sample Content

iii. ईशान व त्याच्या साथीदारांना ती रात्र पहाडावर घालवावी लागली.

iv. मांजरीला बसायला मऊ अंथरूण आहे.

| क्र. | नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|---|
| i. | | | | |
| ii. | | | | |
| iii. | | | | |
| iv. | | | | |

***कृ.५. खालील आकृतीत नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांची उदाहरणे दिली आहेत. आकृतीतील शब्दांचा उपयोग करून अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.**




i. ------------------------

ii. ------------------------

iii. ------------------------

iv. ------------------------

v. ------------------------

vi. ------------------------

vii. ------------------------

viii. ------------------------

ix. ------------------------

x. ------------------------

## क्रियाविशेषण अव्यय (Adverb)

**क्रियापदाबद्दल अधिक माहिती देणाऱ्या अविकारी शब्दाला क्रियाविशेषण अव्यय म्हणतात. वाक्यातील क्रिया केव्हा, कोठे, कशी आणि किती वेळा घडली याविषयीचे उत्तर म्हणजे क्रियाविशेषण अव्यय होय.**

**उदा.** १. चंदू काल गावाला गेला. (केव्हा?)

२. चंदूचा पतंग वर उडाला. (कोठे?)

३. चंदू हळूहळू चालतो. (कसा?)

४. चंदू दोनदा पडला. (किती वेळा?)

Sample Content

# उत्तरे

## व्याकरण

### १. शब्दांच्या जाती

#### • नाम

**कृ.१.**

| | | | |
|---|---|---|---|
| i. | निसर्ग | ii. | मूर्ती |
| iii. | पाय, रस्ता, डोळे | iv. | रस्ता |
| v. | वाट, पहाड | | |
| vi. | मुंबई, परळ, भाग, इस्पितळ | | |
| vii. | कुत्री | viii. | पाठ, हात |
| ix. | शिक्षण, खेडं | x. | बाबा, पोट |

**कृ.२.** गुरु, अधीरता, तन, शूरता, नम्रता, अवशेष, त्याग, संत.

#### • सर्वनाम

**कृ.१.**

| | | | |
|---|---|---|---|
| i. | मी, तुमच्या, जे, ते | ii. | त्याला |
| iii. | मी | iv. | आपण |
| v. | तुम्ही, कोणता | vi. | तो |
| vii. | त्यातून | viii. | आम्ही |
| ix. | ती | x. | हे, मी |
| xi. | ती, माझी | xii. | आमच्या |

**कृ.२.**

i. **माझा** एक मित्र होता.

ii. **आमच्या** गावात आठवडी बाजार भरायचा.

iii. पोटोबा, **आम्हांला** क्षमा करा.

iv. कोणे एके काळी **तो** कावळ्या किल्ल्याचा भाग होता.

v. **आम्ही** तिथे मनसोक्त खेळायचो.

vi. मला बघताच **तो** कपाटावरून उडी मारतो.

vii. **तुमचा** अनोळखी हात लागला म्हणून घाबरलो.

viii. **आमची** तयारी आहे संप करण्याची.

#### • विशेषण

**कृ.१.**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| i. | नाना | ii. | एक | iii. | दाट |
| iv. | जादा | v. | मोठा | vi. | अरुंद |
| vii. | तिसऱ्या | | | | |

**कृ.२.**

i. बांबूची **कोवळी** काडी घेऊन पुढचं टोक ठेचलं, की त्याचा ब्रश व्हायचा.

ii. **ओल्या** वाटेने परत जाताना अंगावरचे कपडे हमखास रंगतात.

iii. आमच्या शाळेला **मोठे** मैदान होते.

iv. ईशानला गिर्यारोहणाचा **विशेष** छंद होता.

v. वाटेत **उंच उंच** पहाड पाहून ते फार रोमांचित झाले होते.

**कृ.३.** (i - ड), (ii – क), (iii – ब), (iv – इ), (v – अ)

**कृ.४.** (i - ड), (ii – इ), (iii – अ), (iv – ब), (v – क)

**कृ.५.**

| क्र. | नाम | विशेषण |
|---|---|---|
| i. | राने | हिरवी |
| ii. | सावली | दाट |
| iii. | डोंगर | निळे |

#### • क्रियापद

**कृ.१.**

i. तोही मार्ग सापडला.

ii. नदी वाहायला लागायची.

iii. मी गोड बोलते.

iv. या सर्वांनी संप पुकारला.

v. ती माझी सवय आहे.

vi. आपण येऊन पोहोचतो ते वरंधा घाटात.

vii. तुम्ही आपले स्वत:चे शिक्षक व्हा.

viii. तो म्हणेल तेवढंच खायची सक्ती असते माझ्यावर!

**कृ.२.**

i. मी तिच्या पाठीवर हात **ठेवते.**

ii. तुमचा अनोळखी हात म्हणून **घाबरली.**

iii. मांजरीचं सर्वांग **शहारतं.**

iv. ती रात्र पहाडावर घालवावी **लागली.**

v. मला खेळायला मात्र **आवडायचे.**

vi. तुम्ही व्यायामासाठी तास-दोन तास काढलेच **पाहिजेत.**

vii. त्याची मजा तुम्ही लुटली **पाहिजे.**

viii. इथून वरंधा घाटाचं मस्त दर्शन **घडतं.**

Sample Content

# १ पत्रलेखन

पत्रलेखन ही एक कला आहे. पत्रलेखन हे आपल्या मनातले भाव / विचार दुसऱ्यापर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवण्याचे उत्तम साधन आहे. विषय आणि स्वरूपानुसार पत्रलेखनाचे दोन प्रकार पडतात.

१. औपचारिक पत्र २. अनौपचारिक पत्र

मागील इयत्तांमध्ये तुम्ही अनौपचारिक पत्र कशी लिहावीत हे शिकला आहात. या वर्षी तुम्ही औपचारिक पत्रलेखन कसे लिहावे हे शिकणार आहात.

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मोबाइल फोनचा वापर वाढल्यामुळे माहिती आणि विचारांची देवाणघेवाण करणे सहज शक्य आहे. त्यामुळे, पत्र लिहिण्याचे प्रमाण आज कमी झाले आहे. तरीदेखील अर्ज करणे, विनंती करणे, मागणी करणे अशा कार्यालयीन कामांसाठी औपचारिक स्वरूपातील पत्रे लिहावी लागतात. ही पत्र व्यक्तिगत किंवा सार्वजनिक स्तरावर लिहिली जातात.

## औपचारिक पत्रलेखनासाठी महत्त्वाच्या गोष्टी:

१. ज्या व्यक्तीला पत्र लिहायचे आहे तिचा उल्लेख योग्य पदासह आणि आदरपूर्वक करावा.
२. पत्रलेखनाची भाषा सरळ, सुगम, सुस्पष्ट व विषयानुरूप असावी.
३. संपूर्ण पत्र मुख्य विषयाला धरूनच लिहावे.
४. पत्र लिहिताना लेखननियमांचा काटेकोरपणे वापर करावा.
५. पत्र ज्यांना पाठवायचे आहे त्यांचे पद, शिक्षण आदी बाबी लक्षात घेऊन पत्रात सुयोग्य भाषा वापरावी.

## औपचारिक पत्रातील मुख्य घटक:

१. दिनांक
२. ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचा पत्ता
३. मायना व विषय
४. मुख्य मजकूर
५. पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता
६. समारोप

## औपचारिक पत्राचे प्रारूप

दिनांक _______
प्रति,
माननीय _______,
_____________,
______××××××.

विषय: _______

माननीय महोदय,

मुख्य मजकूर

आपला विश्वासू,
अ. ब. क.
( ____________ ),
_____________,
_____________,
______××××××
इ-मेल: abc@gmail.com

Sample Content

नमुना कृती

## विनंती पत्र

*१ **तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हांला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्रमांक. २५)

**उत्तर:**

दिनांक: ८ मे, २०२१

प्रति,
माननीय श्री. समीर पाटील,
वर्गशिक्षक, इयत्ता आठवी - ब,
शारदा विद्यालय,
अहमदनगर - ××××××

**विषय:** 'हस्ताक्षर सुंदर करूया!' शिबिरामध्ये सहभागी होण्याबाबत.

महोदय,
आपल्या शाळेत दिनांक १० मे ते २० मे या कालावधीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये मला सहभागी व्हायचे आहे. वार्षिक परीक्षेच्या निकालाच्या दिवशी मी शाळेत उपस्थित राहू शकलो नाही, त्यामुळे मला या शिबिराची काहीच कल्पना नव्हती. कालच मला मित्रांकडून या शिबिराबद्दल माहिती मिळाली. या शिबिराचे संयोजन आपण करत असल्याचे समजले. हे शिबिर दोन दिवसांनी सुरू होणार आहे. तसेच, यासाठी जागाही शिल्लक आहेत. मी या शिबिरात सहभागी होण्यास उत्सुक आहे. त्यामुळे, या शिबिरात सहभागी होण्याची मला संधी द्यावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
शारदा विद्यालय,
अहमदनगर - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

२

**'श्रीराम विद्यामंदिर' आयोजित**
**आंतरशालेय निबंधस्पर्धा**

२५ मार्च
स. १० वाजता

परीक्षक - सुजय जवळकर (प्रसिद्ध लेखक)
श्रीराम विद्यामंदिर, अष्टविनायक चौक, ठाणे (प.) - ४००६०१

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आंतरशालेय निबंधस्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: १५ मार्च, २०२१

प्रति,
मा. सुजय जवळकर,
संभाजीनगर चौक,
ठाणे (प.) - ××××××

Sample Content

**विषय:** आंतरशालेय निबंधस्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., श्रीराम विद्यामंदिर, ठाणे या विद्यालयातील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेत दिनांक २५ मार्च रोजी आंतरशालेय निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. इयत्ता ८ वी, ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.
आपण या आंतरशालेय निबंधस्पर्धेत परीक्षक म्हणून उपस्थित राहावे अशी आमची इच्छा आहे. आमच्या इच्छेस मान देऊन आपण परीक्षक म्हणून उपस्थित राहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी - प्रतिनिधी)
श्रीराम विद्यामंदिर,
अष्टविनायक चौक,
ठाणे (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

३

**ज्ञानभारती विद्यालयातर्फे**
**आंतरशालेय चित्रकला स्पर्धा**
दि. २८ डिसेंबर
वयोगट - १२ वर्षे ते १५ वर्षे
(आपला प्रवेश शाळेमार्फत नोंदवावा.)

**आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत सहभागी होण्याकरता विनंती करणारे पत्र माननीय मुख्याध्यापकांना लिहा.**

**उत्तर:**
दिनांक: १५ डिसेंबर, २०२१

प्रति,
मा. मुख्याध्यापक,
संस्कार विद्यालय,
मातोश्री मार्ग,
मुलुंड, मुंबई - ××××××

**विषय:** आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत सहभागी होण्याबाबत.

माननीय महोदय,
मी कु. अ. ब. क., आपल्या शाळेतील इयत्ता आठवीचा विद्यार्थी आहे. २८ डिसेंबर रोजी ज्ञानभारती विद्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या आंतरशालेय चित्रकला स्पर्धेत भाग घेण्याची माझी इच्छा आहे. आपण मला या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी द्यावी ही नम्र विनंती.
मी या अगोदरही अनेक चित्रकला स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळवली आहेत. तसेच, इयत्ता ७ वी मध्ये एलिमेंटरी परीक्षेत ‘अ’ श्रेणीने उत्तीर्ण झालो आहे. आपण मला संधी दिलीत, तर मी या स्पर्धेत यश मिळवण्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न करेन .
कळावे.

Sample Content

आपला विश्वासू,
अ. ब. क.
इयत्ता - ८ वी 'अ',
संस्कार विद्यालय,
मातोश्री मार्ग,
मुलुंड, मुंबई - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

४

**स्वरसाधना कलामंदिर आयोजित**
**गायन स्पर्धा**
दिनांक: १२ जानेवारी
वेळ: सकाळी १० ते १२ वाजता
वयोगट: १२ वर्षे ते १६ वर्षे
स्थळ: स्वरसाधना कलामंदिराचे सभागृह
संपर्क: संचालक, स्वरसाधना कलामंदिर, जांभळी नाका, ठाणे.

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने गायन स्पर्धेत तुमच्या शाळेतील काही विद्यार्थ्यांचे नाव नोंदवण्याची विनंती करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: १ जानेवारी, २०२१

प्रति,
मा. संचालक,
स्वरसाधना कलामंदिर,
जांभळी नाका, ठाणे - ××××××

**विषय:** गायन स्पर्धेत नाव नोंदवण्याबाबत.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., शारदा विद्यामंदिर या विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. स्वरसाधना कलामंदिरातर्फे गायन स्पर्धा होणार असल्याचे समजले. आमच्या शाळेतील काही विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छितात. आपण स्पर्धेसाठी त्यांची नावे नोंदवून घ्यावीत ही विनंती.
त्यांची नावे पुढीलप्रमाणे:

| | | |
|---|---|---|
| १. | दर्शना बांडागळे | इयत्ता आठवी |
| २. | सिद्धेश शिंदे | इयत्ता आठवी |
| ३. | रोहन जवळ | इयत्ता आठवी |

| | | |
|---|---|---|
| ४. | ऋषभ सावंत | इयत्ता नववी |
| ५. | श्रुती मुणगेकर | इयत्ता नववी |
| ६. | ऋतुजा चांदवडकर | इयत्ता दहावी |

हे सर्व विद्यार्थी स्पर्धेला हजर असतील याची मी खात्री देतो. आपण आमच्या विनंतीला मान देऊन या विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी करून घ्याल, असा मला विश्वास आहे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी प्रतिनिधी),
शारदा विद्यामंदिर,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

Sample Content

५

**आपले ग्रंथ भांडार**

स्वस्त आणि मस्त

शालेय विद्यार्थ्यांकरता सर्व प्रकारचे स्टेशनरी सामान मिळेल.
[विद्यार्थ्यांकरता विशेष सवलत]
पाच रस्ता, मुलुंड (प.) - ××××××

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शालेय वापरासाठी मागवलेल्या साहित्यावर सवलत देण्याची विनंती करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: १ फेब्रुवारी, २०२१

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
आपले ग्रंथ भांडार,
पाच रस्ता, मुलुंड (प.) - ××××××

**विषय:** मागवलेल्या साहित्यावर सवलत मिळण्याबाबत.

माननीय महोदय,
मी अ. ब. क. केळकर विद्यालयाचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आम्ही काही दिवसांपूर्वी आपल्या दुकानातून शालेय वापरासाठी काही शालेय वस्तूंची मागणी केली होती.
केळकर विद्यालय व आपल्या दुकानाचे अनेक वर्षांचे संबंध लक्षात घेऊन आपण आम्हांला या शालेय साहित्यांवर जास्तीत जास्त सवलत द्यावी, ही विनंती!
कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी प्रतिनिधी),
केळकर विद्यालय,
स्टेशन रोड, मुलुंड (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

Sample Content

**सराव कृती**

१

**महात्मा गांधी जयंतीनिमित्त**
शालेय परिसर स्वच्छता उपक्रम
दि. ०२ ऑक्टोबर
**आयोजक:** ‘स्वच्छ ठाणे अभियान’
दगडी शाळा, ठाणे (प.) - ××××××

**उपक्रमात सहभागी होण्याकरता नाव नोंदवण्यासाठी अध्यक्ष ‘स्वच्छ ठाणे अभियान’ यांना विनंती पत्र लिहा.**

२

**जीवनगंगा विद्यालय, सोलापूर**
कवितावाचन स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

दि. १० डिसेंबर

**प्रमुख पाहुणे**
अजय पवार
(प्रसिद्ध कवी)

वेळ: सायंकाळी ५ वाजता

संपर्क: jeevangangavidyalay@gmail.com

**पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी मा. अजय पवार यांना उपस्थित राहण्याची विनंती करणारे पत्र लिहा.**

## नमुना कृती

**मागणी पत्र**

१

**विद्या पुस्तकालय**
लोकमान्यनगर, ठाणे (प.)
सवलत दिनांक: ०१ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी
'त्वरा करा आणि सुवर्णसंधीचा लाभ घ्या'

पुस्तक खरेदी वर २०% सवलत

**विद्यार्थी प्रमुख या नात्याने शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: २ फेब्रुवारी, २०२२

प्रति,
मा. व्यवस्थापक,
विद्या पुस्तकालय,
लोकमान्यनगर,
ठाणे (प.) - ××××××

**विषय:** पुस्तकांची मागणी करण्याबाबत.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., गुरुकृपा विद्यालय, ठाणे या शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आमच्या शालेय ग्रंथालयासाठी काही पुस्तकांची मागणी करावयाची होती. त्याची यादी पुढीलप्रमाणे:

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रती |
|---|---|---|---|
| १. | खिल्ली | पु. ल. देशपांडे | ०४ |
| २. | विशाखा | कुसुमाग्रज | ०३ |
| ३. | वपुर्झा | व. पु. काळे | ०३ |

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखकाचे नाव | प्रती |
|---|---|---|---|
| ४. | ग्रास | नारायण धारप | ०४ |
| ५. | समांतर | सुहास शिरवळकर | ०२ |

ही पुस्तके लवकरात लवकर पाठवण्याची व्यवस्था करावी ही नम्र विनंती. पुस्तके शालेय ग्रंथालयासाठी असल्याने यांवर योग्य ती सवलत द्याल, अशी आशा करतो. पुस्तकांचे देयकही पाठवावे जेणेकरून रक्कम पाठवणे सोपे जाईल.
कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी प्रतिनिधी),
गुरुकृपा विद्यालय,
नौपाडा, ठाणे (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

२

**समर्थ बाग**
विविध प्रकारच्या रोपांचे विक्रेते
औषधी रोपांवर खास सवलत
सिद्धिविनायक चौक, ठाणे (प.) जि. ठाणे

**आपल्यासाठी काही रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.**

Sample Content

**उत्तर:**

दिनांक: २ फेब्रुवारी, २०२१

प्रति,
मा. व्यवस्थापक,
समर्थ बाग,
सिद्धिविनायक चौक,
ठाणे (प.) - ××××××

**विषय:** रोपांची मागणी करण्याबाबत.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., आपल्या समर्थ बागेची जाहिरात वर्तमानपत्रात वाचली. जाहिरातीत आपण औषधी रोपांवर सवलत देत आहात असे नमूद केले आहे. मला माझ्या बागेसाठी औषधी रोपे, तसेच काही फुलांची रोपे मागवायची आहेत. त्यांची यादी मी पुढे देत आहे.

| क्र. | वनस्पतीचे नाव | नग |
|---|---|---|
| १. | तुळस | ०५ |
| २. | मोगरा | ०४ |
| ३. | झेंडू | ०५ |

| क्र. | वनस्पतीचे नाव | नग |
|---|---|---|
| ४. | कडुनिंब | ०३ |
| ५. | कोरफड | ०४ |

ही रोपे लवकरात लवकर पाठवण्याची व्यवस्था करावी, ही नम्र विनंती. रोपांसोबत सवलतीच्या दराने होणाऱ्या रकमेचे बिल पाठवावे म्हणजे आपल्याला रक्कम पाठवण्याची व्यवस्था करता येईल.
कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
३५ - अ, साईकृपा वाडा,
देवधरनगर, महालक्ष्मी रोड,
ठाणे (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

३

**रोहन स्पोर्टस् क्लब**

आमच्या येथे विविध खेळांचे साहित्य मिळेल.

मोठ्या खरेदीवर
२०% पर्यंत सूट

लालबहादूर शास्त्री मार्ग, भायखळा (प.) -××××××

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपल्या शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: १ फेब्रुवारी, २०२२

प्रति,
माननीय व्यवस्थापक,
रोहन स्पोर्टस् क्लब,
लालबहादूर शास्त्री मार्ग,
भायखळा (प.) - ××××××

**विषय:** शाळेसाठी क्रीडासाहित्याची मागणी करण्याबाबत.

माननीय महोदय,

मी अ. ब. क., न्यू व्हिजन स्कूलची विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. मुख्याध्यापकांच्या अनुमतीने मी हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेसाठी क्रीडा साहित्याची आवश्यकता आहे. आम्हांला हवे असणाऱ्या क्रीडासाहित्याची यादी मी पुढे देत आहे:

| क्र. | साहित्य | नग |
|---|---|---|
| १. | फुटबॉल | ०४ |
| २. | क्रिकेट बॅट | ०३ |

| क्र. | साहित्य | नग |
|---|---|---|
| ३. | क्रिकेट बॉल | ४० |
| ४. | बॅडमिंटन रॅकेट | ०८ |

वरील क्रीडासाहित्य आपण लवकरात लवकर शाळेच्या पत्त्यावर पाठवावे ही विनंती. आमच्या शाळेचे आपल्या सोबतचे अनेक वर्षांचे संबंध लक्षात घेता आपण जास्तीत जास्त सवलत द्यावी ही विनंती. सोबत देयकही पाठवावे, जेणेकरून धनादेश पाठवणे सोपे होईल.

आपली विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी - प्रतिनिधी),
न्यू व्हिजन स्कूल,
शास्त्रीनगर, भायखळा (प.) ××××××
इ-मेल: abc@gmail.com

४

**सुगम विद्यालय, ठाणेतर्फे आयोजित**
**आंतरशालेय विज्ञान प्रकल्प स्पर्धा**

दि.२० जानेवारी — स्थळ: शाळेचे सभागृह
सकाळी १० वाजता — इयत्ता: ८ वी ते १० वी साठी

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शाळेच्या मुख्याध्यापकांना विज्ञान प्रयोग साहित्यांची मागणी करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: १२ जानेवारी, २०२२

प्रति,
माननीय मुख्याध्यापक,
सुगम विद्यालय,
महालक्ष्मीनगर,
कळवा (प.) - ××××××

**विषय:** विज्ञान प्रयोग साहित्यांची मागणी करण्याबाबत.

माननीय महोदय,

मी अ. ब. क., आपल्या शाळेचा विद्यार्थी - प्रतिनिधी या नात्याने आपणांस हे पत्र लिहीत आहे. आपल्या शाळेत दिनांक २० जानेवारी रोजी होणाऱ्या विज्ञान प्रकल्प स्पर्धेत आम्ही विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे. या स्पर्धेसाठी आम्हांला काही विज्ञान प्रयोग साहित्यांची आवश्यकता होती.

हे साहित्य आम्हांला उपलब्ध झाल्यास विज्ञान प्रात्यक्षिके दाखवता येतील. प्रयोगासाठी लागणाऱ्या विज्ञान साहित्यांची यादी पुढीलप्रमाणे:

| क्र. | प्रयोगाचे साहित्य | नग |
|---|---|---|
| १. | परीक्षानळी | १० |
| २. | बर्नर | ०२ |
| ३. | मोजपात्र | ०४ |

| क्र. | प्रयोगाचे साहित्य | नग |
|---|---|---|
| ४. | चंचुपात्र | ०५ |
| ५. | सूक्ष्मदर्शिका | ०८ |

Sample Content

या यादीतील सर्व वस्तू प्रयोगाच्या दृष्टीने गरजेच्या आहेत. आपण हे प्रयोग साहित्य लवकरात लवकर उपलब्ध करून द्याल, अशी आशा करतो.
कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
(विद्यार्थी - प्रतिनिधी),
सुगम विद्यालय,
महालक्ष्मीनगर,
कळवा (प.) ××××××
इ-मेल: abc@gmail.com

५

दि. १२ फेब्रुवारी

**कचरापेटीची दुर्दशा**

दादरमधील संभाजीनगर चौक परिसरात कचरापेटीच्या दुर्दशेमुळे रहिवासी त्रस्त झाले आहेत. कचरापेटी पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने कचरा इतरत्र पसरलेला आढळतो. हा परिसर स्वच्छ करण्यात यावा अशी मागणी संभाजीनगरमधील रहिवाशांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे.

**वरील बातमी वाचा आणि परिसरातील रहिवासी या नात्याने नवीन कचरापेटीची मागणी करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: १३ फेब्रुवारी, २०२२

प्रति,
मा. आरोग्याधिकारी,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
दादर - ××××××

**विषय:** नवीन कचरापेटीची मागणी करण्याबाबत.

माननीय महोदय,
नमस्कार! मी अ. ब. क. संभाजीनगर चौक, दादर येथील रहिवासी असून नवीन कचरापेटीची मागणी करण्यासंदर्भात आपणांस हे पत्र लिहीत आहे. संभाजीनगर चौक या परिसरात पुरेशा कचरापेटींची व्यवस्था नसल्याने कचरा इतरत्र विखुरलेला आहे. परिसरातील लोकसंख्येचा विचार करता उपलब्ध असलेल्या कचरापेट्या अपुऱ्या पडत आहेत.
कचऱ्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांत परिसरातील लहान मुलांमध्ये आजाराचे प्रमाण वाढल्याचेही निरीक्षणास आले आहे.
आपण याचे गांभीर्य लक्षात घेऊन ही समस्या लवकरात लवकर सोडवाल अशी आशा करतो.
कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
४०८, रामचंद्र अपार्टमेंट,
संभाजीनगर चौक,
दादर (प.) ××××××
इ-मेल: abc@gmail.com

Sample Content

सराव कृती

१

**मनोरंजन**
[चला घेऊ साहित्याचा आस्वाद]
(दिवाळी अंक – २०२१ - २०२२)
२०% सवलत
नव कवी, लेखक यांच्या कथा, कवितांनी सजलेले मासिक.
बोरकर प्रकाशन, सिंहगड, पुणे (प.) - ××××××

**वाचक या नात्याने दिवाळी अंकाची मागणी करणारे पत्र लिहा.**

२

**मनोरमा स्टेशनरी**
[शालेय वस्तूंचे भांडार]
आमच्या येथे सर्व प्रकारचे स्टेशनरी सामान मिळेल.
**स्थळ:** विद्यानिकेतन मार्ग, कोपरी, ठाणे (पू.) - ××××××

**विद्यार्थी-प्रतिनिधी या नात्याने स्टेशनरी साहित्याची मागणी करणारे पत्र लिहा.**

नमुना कृती

तक्रार पत्र

१

दि. २६ जानेवारी
**फटफजिती**
(धमाल, विनोदी नाटक...)
दिग्दर्शक: प्रीतम साठे
(तिकीट विक्री सुरू)
स्थळ: डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह
घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.) - ××××××

**नाटकाची तिकिटे न मिळाल्याबद्दल तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: २४ जानेवारी, २०२२

प्रति,
मा. व्यवस्थापक,
काशिनाथ घाणेकर,
घोडबंदर रोड, मानपाडा.
ठाणे (प.) - ××××××

**विषय:** नाटकाची तिकिटे न मिळाल्याबाबत.

माननीय महोदय,
नमस्कार, मी अ. ब. क., काही दिवसांपूर्वी मी आपल्या मोबाइल सेवेद्वारे 'फटफजिती' या नाटकाची तिकिटे बुक केली होती. या नाटकाचा पहिला प्रयोग डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात दिनांक २६ जानेवारी रोजी होणार आहे; परंतु अद्यापही मला नाटकाची तिकिटे मिळालेली नाहीत.
आपण उद्याच्या दिवसातच नाटकाची तिकिटे घरपोच द्याल, अशी आशा करतो.
कळावे.

Sample Content

आपला विश्वासू,
अ. ब. क.
५०२ - अ - मयुरेश सोसायटी,
वसंतविहार, ठाणे (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

२

दि. २७ फेब्रुवारी

रिद्धी प्रकाशन, पुणे

**मराठी भाषा दिनानिमित्त...**
**भव्य प्रदर्शन**

[जुन्या-नव्या कथा-कादंबरींचा खजाना ]

(घरपोच सुविधा उपलब्ध)
**स्थळ:** मराठीभाषाप्रेमी मंडळ, सिद्धिविनायक चौक,
मालाड (पू.) - ××××××

**मागवलेल्या पुस्तकांची पाने फाटलेली असल्याकारणाने तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: २२ फेब्रुवारी, २०२२

प्रति,
मा. व्यवस्थापक,
मराठी भाषाप्रेमी मंडळ,
सिद्धिविनायक चौक,
मालाड (पू.) - ××××××

**विषय:** मागावलेल्या पुस्तकांची पाने फाटली असल्याकारणाने तक्रार करणारे पत्र.

माननीय महोदय,

नमस्कार, मी अ. ब. क., मालाडमधील रहिवासी आहे. २७ फेब्रुवारी रोजी आपल्या मंडळातर्फे मराठी पुस्तकांचे भव्य प्रदर्शन ठेवण्यात आले होते. या प्रदर्शनातून मी काही पुस्तके खरेदी केली होती; परंतु यातील काही पुस्तकांच्या प्रती फाटलेल्या असल्याच्या आढळून आल्या आहेत. तसेच, काही पुस्तकांची पाने गहाळ झाली आहेत.

मी या सदोष प्रती आपल्याकडे पाठवत असून त्याबदल्यात उत्तम प्रती मिळतील अशी आशा करतो.

कळावे.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
३०२, गुरुनाथ सोसायटी,
गोकुळनगर,
मालाड (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

Sample Content

**३ तुमच्या परिसरातील खेळाच्या मैदानावर झालेल्या अतिक्रमणाबाबत महानगरपालिकेकडे तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: ०८ ऑक्टोबर, २०२१

प्रति,
मा. महानगरपालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ××××××

**विषय:** खेळाच्या मैदानावर झालेल्या अतिक्रमणाबाबत.

माननीय महोदय,
दादरच्या प्रभादेवी परिसरातील ‘प्रबोधनकार ठाकरे क्रीडा मैदान’ या मैदानावर अतिक्रमण झाल्याचे दिसून येत आहे. अनधिकृत दुकाने, तसेच अनधिकृत वस्त्या उभारल्या आहेत. यामुळे, येथे कचऱ्याचे साम्राज्य उभे राहिले आहे. खेळासाठी राखीव असलेल्या मैदानाचा गैरवापर होताना दिसत आहे.
आधीच मुंबईसारख्या शहरात, मुलांना खेळाच्या मैदानासाठी जागा उपलब्ध नाही. जी आहेत त्यांना या अतिक्रमणापासून वाचवावे ही विनंती. कृपया या तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन आपण योग्य ती कार्यवाही कराल, अशी आशा करतो.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
८०२ - राधाकृष्ण अपार्टमेंट,
प्रभादेवी, दादर,
मुंबई - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

**४ आपल्या परिसरात होणाऱ्या अनियमित वीज पुरवठ्याबद्दल तक्रार करणारे पत्र महानगरपालिकेला लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: ०९ फेब्रुवारी, २०२२

प्रति,
कार्यकारी अभियंता,
ठाणे महानगरपालिका,
ठाणे (प.) - ××××××

**विषय:** अनियमित वीजपुरवठ्याबाबत तक्रार पत्र.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., ठाण्याच्या चरई विभागातील रहिवासी आहे. आमच्या विभागात गेले दोन आठवडे दुपारी २ ते सायं. ५ वाजेपर्यंत वीज पुरवठा खंडित होत आहे. उन्हाळ्याचे दिवस, तसेच शाळा बंद असल्याकारणाने मुलांचे ऑनलाईन क्लासेस त्यातच येऊन ठेपलेल्या वार्षिक परीक्षा हे सर्व लक्षात घेता तीन तासांच्या या खंडित वीज पुरवठ्याने आम्ही सर्व नागरिक त्रस्त झालो आहोत.
आपण ही परिस्थिती लक्षात घेऊन योग्य ती कार्यवाही कराल, अशी आशा बाळगतो.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
४०२ - पारिजात सोसायटी,
चरई, ठाणे (प.) - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

Sample Content

**५ तुमच्या भागात घंटागाडी नियमित येत नसल्याकारणाने महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्याकडे तक्रार करणारे पत्र लिहा.**

**उत्तर:**

दिनांक: १२ डिसेंबर, २०२१

प्रति,
मा. आरोग्याधिकारी,
पुणे महानगरपालिका,
पुणे - ××××××
**विषय:** घंटागाडी नियमित येत नसल्याकारणाने तक्रार पत्र.

माननीय महोदय,
मी अ. ब. क., पुण्यातील शिवाजी महाराज चौक या परिसरात राहणारा रहिवासी आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून आमच्या परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साठलेला आहे. घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिकांना कचऱ्याच्या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे.
कचऱ्याच्या ढिगामुळे मच्छरांचा उपद्रव होत असून मलेरिया आणि डेंग्यूची लक्षणे आढळून आली आहेत. तरी कृपया आपण या समस्येकडे लक्ष देऊन हा कचरा साफ करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
शिवाजी महाराज चौक,
पुणे - ××××××
इ-मेल: abc@gmail.com

## सराव कृती

**१**

**पवन स्पोर्टस्, भांडुप**
आमच्या येथे सर्व खेळांचे साहित्य मिळेल.
(घरपोच सुविधा उपलब्ध)
मोठ्या ऑर्डरवर
२०% सवलत
**पत्ता:** हनुमाननगर, भांडुप (पू.) - ××××××

**विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शालेय वापरासाठी मागवलेले क्रीडासाहित्य सदोष असल्याकारणाने तक्रार करणारे पत्र लिहा.**

**२ तुमच्या परिसरात अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने तक्रार करणारे पत्र जल अभियंता यांना लिहा.**

Sample Content

## AVAILABLE BOOKS FOR STD. VIII:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- History and Civics
- Geography
- General Science
- Mathematics

**NOTES**
- My English Book
- मराठी बालभारती
- हिंदी सुलभभारती
- इतिहास व नागरिकशास्त्र
- भूगोल
- सामान्य विज्ञान
- गणित

**WORKBOOK**
- English Balbharati
- मराठी सुलभभारती
- हिंदी सुलभभारती
- My English Book
- मराठी बालभारती

## AVAILABLE BOOKS FOR STD. IX:
(ENG., MAR. & SEMI ENG. MED.)

**NOTES**
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology

**NOTES**
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान

**WORKBOOK**
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती


**ADDITIONAL TITLES**

Grammar & Writing Skills Books
- Marathi
- Hindi
- English

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College

Degree College | Entrance Exams | Stationery




Explore our range of STATIONERY

Target Publications® Pvt. Ltd.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15

**Website:** www.targetpublications.org

**Email:** mail@targetpublications.org

Visit Our Website